

जिज्ञासा
विवेक
अध्ययन
अनुभूती
निदिध्यास
संवाद
संप्रेषण
अभिव्यक्ती
मीमांसा
सदाचार

रयत शिक्षण संस्थेचे,

# सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय,उंब्रज

## कला,वाणिज्य व विज्ञान

स्थापना-१९८९

ता.कराड जि.सातारा 415109

शिवाजी विद्यापीठ संलग्नित

NAAC Reaccredited (4th Cycle)
Grade-B(CGPA 2.24)
AISHE CODE C-11227

Email :-rssmmuks@yahoo.co.in
website:-www.mrjmu.ac.in

# माहिती पुस्तिका



महाविद्यालयाचे संकेतस्थळ

रयत शिक्षण संस्थेचे,

# पदाधिकारी




## अध्यक्ष
मा.शरदचंद्र पवार साहेब



संघटक
मा.डॉ.अनिल पाटील



चेअरमन
मा.चंद्रकांत दळवी



चेअरमन, सी.डी.सी.
मा.ॲड.रविंद्र पवार



सचिव
मा.विकास देशमुख



सहसचिव (उ.शि.)
मा.डॉ.शिवलिंग मेनकुदळे



सहसचिव (ऑडीट)
मा.डॉ.राजेंद्र मोरे



सहसचिव (माध्यमिक)
मा.बी.एन.पवार

## * रयत शिक्षण संस्था, सातारा *

महाराष्ट्राच्या शैक्षणिक व सामाजिक इतिहासात रयत शिक्षण संस्थेचे स्थान अनन्यसाधारण आणि प्रेरणादायी आहे. 'शिक्षण हे समाज परिवर्तनाचे एकमेव साधन आहे हे जाणून पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ४ ऑक्टोबर १९१९ रोजी काले येथे संस्थेची स्थापना केली. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, कामगार आणि वंचित समाज घटकांतील मुलांना शिक्षणाची संधी मिळावी, हा त्यामागील मुख्य उद्देश होता, कमवा आणि शिका (Earn and Learn) ही संकल्पना प्रत्यक्षात आणून शिक्षण सर्वसामान्यांच्या दारी नेण्याचे महान कार्य कर्मवीरांनी केले.सुरुवातीच्या काळात आर्थिक साधनांची कमतरता,सामाजिक विरोध आणि जातीय अडथळे असूनही कर्मवीर भाऊराव पाटील यांनी जिद्दीने कार्य चालू ठेवले. त्यांनी विद्यार्थ्यांना श्रमाच्या माध्यमातून शिक्षणाची संधी दिली. विद्यार्थी शेतात, वसतिगृहात किंवा इतर कामांमध्ये श्रम करून स्वतःच्या शिक्षणाचा खर्च भागवत असत. या प्रयोगामुळे शिक्षणात स्वावलंबन, श्रमसंस्कार आणि सामाजिक समता यांचा संगम घडून आला. रयत शिक्षण संस्थेने ग्रामीण समाजजीवनात शिक्षणाचा व्यापक प्रसार केला. प्राथमिक शिक्षणापासून महाविद्यालयांपर्यंत विविध स्तरांवरील शैक्षणिक संस्था उभारून शिक्षणाचा विस्तार केला. विशेषतः मुलींच्या शिक्षणासाठी स्वतंत्र शाळा व वसतिगृहे सुरू करून स्त्रीशिक्षणाला चालना दिली.

सामाजिक समतेचा पुरस्कार करताना सर्व जातीधर्मांतील विद्यार्थ्यांना समान संधी देण्याची परंपरा संस्थेने जोपासली. स्वातंत्र्योत्तर काळात संस्थेने उच्च शिक्षण क्षेत्रातही पाऊल टाकले. कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, कृषी कायदा, व्यवस्थापन, शिक्षणशास्त्र अशा विविध शाखांमध्ये महाविद्यालये सुरू करून ग्रामीण युवकांना उच्च शिक्षणाची दारे खुली केली. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, संशोधनाला प्रोत्साहन, तसेच स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रे सुरु करून विद्यार्थ्यांना व्यापक संधी उपलब्ध करून दिल्या आहेत.१९२४ मध्ये संस्थेचे सातारा येथे स्थलांतर करण्यात आले. एक हरिजन विद्यार्थी घेऊन अण्णांनी वसतिगृह सुरू केले. पुढे रयत शिक्षण संस्थेच्या शिक्षण कार्यास त्यांनी वाहून घेतले. स्थानिक लोकांच्या गरजेतून आणि रयत शिक्षण संस्थेच्या सहकार्यातून कर्मवीरांच्या प्रेरणेने शिक्षण प्रसाराचे कार्य संख्यात्मकदृष्ट्या आणि गुणात्मकदृष्ट्या ही गेली १०६ वर्षे सातत्याने वृद्धिंगत होत आले आहे.१९१९ साली लावलेल्या ज्ञानरोपट्याचे आज एका प्रचंड वटवृक्षात रूपांतर झाले आहे. महाराष्ट्राच्या १५ आणि कर्नाटक राज्यातील ०१ अशा १६ जिल्ह्यांमध्ये पूर्व प्राथमिक शिक्षणापासून विद्यापीठीय शिक्षणापर्यंत प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालय, वसतिगृहे, आश्रम शाळा अशा एकूण ७४२ शाखांमध्ये ८,१८,०८९ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तर ११६१७ सेवक शिक्षण प्रसाराचे पवित्र कार्य करीत आहेत. रयत शिक्षण संस्था ही खऱ्या अर्थाने महाराष्ट्रासह कर्नाटक राज्यात शिक्षणातून समाज परिवर्तनाचे ऐतिहासिक काम करीत आहे.

## * महाविद्यालयाची माहिती *

महाराष्ट्राच्या सामाजिक आणि शैक्षणिक जडणघडणीत अमूल्य योगदान देणाऱ्या रयत शिक्षण संस्थेद्वारे १९८९ मध्ये उंब्रज पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या आणि प्रामुख्याने विद्यार्थ्यांच्या गरजांचा विचार करून वरिष्ठ महाविद्यालय सुरू करण्यात आले. कालानुरूप बदल होत, महिला महाविद्यालय व कला शाखेपासून सुरू झालेला शैक्षणिक प्रवास वाणिज्य, विज्ञान,बी.सी.ए. ची मान्यता आणि को-एज्युकेशन (सहशिक्षण) पर्यंत येऊन पोहोचला आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालय कटिबद्ध असून नियमितपणे विविध उपक्रम राबवीत असते. तसेच आधुनिक शिक्षणास अनुसरून AI शिक्षणासह, नव-नवीन कोर्सेस आणि MPSC, IBPS सारख्या स्पर्धा परीक्षांची तयारी विद्यार्थ्यांकडून करून घेत आहे. तसेच महाविद्यालयाने राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेची (NAAC) चौथी फेरी यशस्वीरित्या पूर्ण केलेली आहे.

रयतच्या या महाविद्यालयाने कर्मवीर अण्णांच्या विचारांचा वारसा जपत उंब्रज आणि परिसरातील विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवले आहे. कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक सुविधा आणि संस्कारक्षम वातावरण यामुळे हे महाविद्यालय ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी आशेचा दीपस्तंभ ठरले आहे.

## * राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० *

भारताच्या केंद्रीय मंत्रिमंडळाने २९ जुलै २०२० रोजी 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' (NEP 2020) मंजूर केले. हे धोरण भारतातील शिक्षण व्यवस्थेची नवी दिशा आणि दृष्टी स्पष्ट करणारे आहे. 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' हे देशातील ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागांसाठी लागू आहे. या धोरणाने प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षणापर्यंत सर्व स्तरांवर एक व्यापक आराखडा दिलेला असून या धोरणाचा मुख्य उद्देश २०३० पर्यंत भारताच्या शिक्षण प्रणालीत मूलभूत आणि सकारात्मक बदल घडवून आणणे हा आहे.'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' धोरणात ५+३+३+४ या नवीन शैक्षणिक संरचनेचा अवलंब करण्यात आला आहे. हे धोरण विद्यार्थीकेंद्रित असून,विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देणारे आहे. विद्यार्थ्यांनी केवळ सरकारी नोकऱ्यांवर अवलंबून न राहता, स्वतःचा व्यवसाय किंवा उद्योजकता विकसित करावी यासाठीही प्रोत्साहन दिले आहे. तसेच विद्यार्थ्यांना परदेशी भाषा शिकण्याची संधी दिली जाते. इयत्ता ८ वी नंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार वेगवेगळे शैक्षणिक प्रवाह (streams) निवडण्याची मुभा आहे. इयत्ता ५ वी पर्यंत शिक्षण मातृभाषेत किंवा स्थानिक भाषेत देण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. तसेच, इयत्ता ८ वी पर्यंत आणि त्यानंतरही शक्य तितक्या प्रमाणात या पद्धतीचा वापर सुरू ठेवण्याची शिफारस केली आहे. एकूणच, 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' धोरण हे शिक्षण क्षेत्रात मोठे परिवर्तन घडवून आणणारे धोरण आहे. यामध्ये विद्यार्थ्यांच्या गरजा, आवडी आणि कौशल्ये लक्षात घेऊन अध्यापन आणि शिक्षण प्रक्रियेवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे.या धोरणाची अंमलबजावणी पदवी (UG) अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षासाठी २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात आली असून आपल्या महाविद्यालयात यशस्वीरित्या राबविले जात आहे.

## * महाविद्यालय विकास समिती (CDC) *

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम ९७ नुसार प्रत्येक महाविद्यालयात 'महाविद्यालय विकास समिती' स्थापन करणे बंधनकारक आहे. ही समिती महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी निर्णय घेणारी आणि धोरण ठरविणार सर्वोच्च संस्था असते. शैक्षणिक दर्जा वाढवणे व नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, पायाभूत सुविधा, इमारत, ग्रंथालय, प्रयोगशाळा, क्रीडांगण विकसित करणे. अर्थसंकल्प तयार करणे व खर्चावर नियंत्रण ठेवणे, विद्यार्थी कल्याण, शिष्यवृत्ती, कमवा व शिका, प्लेसमेंट यावर काम करणे. शिक्षक व कर्मचारी भरती साठी शिफारस करणे. NAAC, AISHE, NIRF साठी महाविद्यालय तयार करणे, वार्षिक अंदाजपत्रक व लेखापरीक्षण अहवाल मंजूर करणे. विकास आराखडा तयार करून रयत शिक्षण संस्थेकडे पाठवणे, नवीन तुकड्या, अभ्यासक्रम, विषय सुरू करण्यासाठी विद्यापीठाकडे शिफारस करणे, इमारत बांधकाम, दुरुस्ती व इतर विकासकामांना मंजुरी देणे. विद्यार्थी फी व इतर शुल्क निश्चित करणे. शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचे निवारण करणे, ही आणि यासारखी अनेक महत्वाची कार्ये पार पाडण्यास महाविद्यालय विकाससमिती महाविद्यालयास सहकार्य करीत असते.

## * अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) *
### Internal Quality Assurance Cell

NAAC च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार २००३ पासून प्रत्येक महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष स्थापन केलेला आहे. महाविद्यालयाचा शैक्षणिक व प्रशासकीय दर्जा सतत उंचावणे व त्यावर देखरेख ठेवणे हे IQAC चे मुख्य काम आहे. गुणवत्ता संवर्धन, शिक्षण, संशोधन व प्रशासकीय कामात गुणवत्ता आणणे. NAAC साठी तयारी, महाविद्यालयाला NAAC मानांकनासाठी तयार करणे. स्वयं-मूल्यांकन, दरवर्षी AQAR अहवाल तयार करणे, नवीन पद्धती, विद्यार्थीकेंद्रित शिक्षण व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे. Feedback घेणे, विद्यार्थी, पालक, शिक्षक, माजी विद्यार्थी आणि नियोक्ता यांच्याकडून अभिप्राय घेऊन सुधारणा करणे, शैक्षणिक आराखडा, वार्षिक शैक्षणिक कॅलेंडर व कृती आराखडा बनवणे, दस्तऐवजी करण, सर्व विभागांचे रेकॉर्ड, अहवाल,फोटो व्यवस्थित ठेवणे. कार्यशाळा, शिक्षकांसाठी FDP, विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकास कार्यक्रम घेणे.

Best Practices, महाविद्यालयातील चांगले उपक्रम शोधून त्यांना प्रोत्साहन देणे. AQAR पाठवणे, दरवर्षी NAAC ला Annual Quality Assurance Reort ऑनलाइन सादर करणे. SSR तयारी, NAAC मूल्यांकनासाठी Self-Study Reort तयार करणे. अशा प्रकारची महत्वाची कामे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या माध्यमातून पूर्ण केली जातात.

## * रयत स्पर्धा परीक्षा ॲकॅडमी *

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या 'शिक्षणातून परिवर्तन' या विचारावर आधारित रयत स्पर्धा परीक्षा ॲकॅडमी ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी वरदान ठरली आहे. रयत शिक्षण संस्था, सातारा यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना MPSC, UPSC, बँकिंग, पोलिस भरती, SSC सारख्या स्पर्धा परीक्षांसाठी मोफत व अल्प दरात मार्गदर्शन देण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयात रयत स्पर्धा परीक्षा ॲकॅडमी सुरू केलेली आहे. त्या माध्यामतून ग्रामीण विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी शहरांप्रमाणे सुविधा देणे, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या 'कमवा व शिका' तत्त्वावर अधिकारी घडवणे. कमी खर्चात दर्जेदार मार्गदर्शन, नोट्स, टेस्ट सिरीज उपलब्ध करणे. अशी कार्ये केली जातात. रयतमधून अधिकारी झालेले माजी विद्यार्थी प्रेरणा व मार्गदर्शन देण्याचे काम करतात.

## * संशोधन समिती *

(Research Committee)

महाविद्यालयात संशोधन संस्कृती रुजवणे, शिक्षक व विद्यार्थ्यांना संशोधनासाठी प्रोत्साहन देणे व नाविन्यपूर्ण उपक्रमांना चालना देणे या उद्देशाने महाविद्यालयात 'संशोधन समिती' कार्यरत आहे. शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाबद्दल आवड निर्माण करणे. प्राध्यापकांना संशोधन प्रकल्प, शोधनिबंध लेखन व प्रकाशनासाठी प्रोत्साहित करणे. विद्यार्थी सहभाग, UG व PG विद्यार्थ्यांना छोटे संशोधन प्रकल्प, सर्वेक्षण, प्रेझेंटेशनसाठी मार्गदर्शन करणे. निधी उपलब्धता, UGC, ICSSR, DST, विद्यापीठ स्तरावरील Minor/Major Research Projects साठी प्रस्ताव पाठवणे, सहकार्य, इतर महाविद्यालये, उद्योग व संशोधन संस्था यांच्यासोबत MoU करून संयुक्त संशोधनास चालना देणे, संशोधनातील Plagiarism व नैतिक मूल्यांबाबत जागरूकता निर्माण करणे, महाविद्यालयाचे वार्षिक संशोधन धोरण व कृती आराखडा तयार करणे. Research Methodology, IPR, Plagiarism, SPSS, Data Analysis यावर कार्यशाळा घेणे. शिक्षकांचे संशोधन प्रस्ताव तपासून विद्यापीठ/UGC कडे शिफारस करणे. विद्यापीठाच्या 'आविष्कार' संशोधन महोत्सवात विद्यार्थ्यांना सहभागी करून घेणे. शिक्षकांचे Ph.D. मार्गदर्शन, प्रकाशित शोधनिबंध,पुस्तके, पेटंट यांच्या नोंदी अद्ययावत ठेवणे, नवीन शैक्षणिक धोरणानुसार UG स्तरावर संशोधन आधारित प्रकल्प सुरू करणे, ही कामे समर्थपणे केले जातात.

## * प्रशिक्षण व प्लेसमेंट विभाग *

(Training & Placement Cell)

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनवणे व प्रतिष्ठित कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणे या उद्देशाने महाविद्यालयात 'प्रशिक्षण व प्लेसमेंट विभाग' कार्यरत आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या 'कमवा व शिका' या तत्त्वावर हा विभाग काम करतो. विद्यार्थ्यांमध्ये Soft Skills, Communication, IT कौशल्ये विकसित करणे. स्थानिक व राष्ट्रीय कंपन्यांशी संपर्क साधून कॅम्पस इंटरव्ह्यू आयोजित करणे. विविध क्षेत्रातील करिअर संधी, स्पर्धा परीक्षा, उच्च शिक्षण याबाबत मार्गदर्शन करणे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळावा यासाठी कंपन्यांमध्ये इंटर्नशिप उपलब्ध करणे. स्वयंरोजगार व स्टार्टअपसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन व प्रशिक्षण देणे. व्यक्तिमत्व विकास, इंग्रजी संभाषण, संगणक, टॅली, डिजिटल मार्केटिंग कोर्सेस घेणे. TCS, ICICI, HDFC, Bajaj, स्थानिक MIDC कंपन्या यांना बोलावून भरती प्रक्रिया राबवणे. तालुका व जिल्हा स्तरावरील रोजगार मेळाव्यांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करणे. मुलाखतीची भीती घालवण्यासाठी तज्ज्ञांमार्फत सराव मुलाखती घेणे. विद्यार्थ्यांचे प्रोफेशनल CV, LinkedIn प्रोफाइल तयार करून देणे. अंतिम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांची शैक्षणिक व कौशल्य माहिती गोळा करून कंपन्यांना पाठवणे. कौशल्य विकास संस्था, बँका, उद्योग यांच्यासोबत सामंजस्य करार करणे. या जबाबदाऱ्या पार पाडल्या जातात.

## * राष्ट्रीय सेवा योजना (NSS) *

भारतामध्ये, विद्यार्थ्यांना राष्ट्रसेवेच्या कार्यात सहभागी करून घेण्याची संकल्पना 'राष्ट्रपिता' महात्मा गांधी यांच्या काळापासूनच अस्तित्वात आहे. राष्ट्रीय सेवा योजना (NSS) हा शैक्षणिक विस्ताराच्या क्षेत्रातील एक उदात्त प्रयोग आहे. सातत्यपूर्ण सामाजिक संवादांच्या माध्यमातून, विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यामध्ये स्वयंसेवेची भावना रुजविणे यात अंतर्भूत आहे. ही योजना आपल्या शैक्षणिक संस्थांना समाजाच्या अधिक जवळ आणते. समाजाच्या विकासासाठी इष्ट असलेले परिणाम साध्य करण्याकरिता, ज्ञान आणि कृती यांचा मेळ कसा घालावा, हे ही योजना दर्शवते. गेल्या काही वर्षांत, समाजाशी जोडून घेण्याच्या बाबतीत, NSS ही भारतातील विद्यार्थी-युवकांची सर्वात मोठी चळवळ म्हणून उदयास आली आहे. NSS च्या मूलभूत तत्त्वांनुसार, स्वयंसेवकाने समाजाशी सतत संपर्कात राहणे अपेक्षित असते. म्हणूनच, राष्ट्रीय एकात्मतेचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने, आमच्या NSS कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी आम्ही कराड तालुक्यातील चरेगाव या गावाची निवड केली आहे.

## * प्रवेशा संदर्भातील नियमावली *

**मान्यताप्राप्त प्रवेशसंख्या**

(Numbar - seats Approved)

| अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेश क्षमता | किमान पात्रता |
|---|---|---|
| बी.ए. भाग - 1 | 120 (Grantable) | १२ वी उत्तीर्ण किंवा समकक्ष |
| बी.कॉम भाग - 1 | 120 (Non-Grantable) | १२ वी उत्तीर्ण किंवा समकक्ष |
| बी.एस्सी भाग - 1 | 120 (Non-Grantable) | १२ वी उत्तीर्ण किंवा समकक्ष |
| बीसीए भाग - 1 | 60 (Non-Grantable) | १२ वी उत्तीर्ण किंवा समकक्ष |

**नियम क्र.१ (अ)**

ज्या ठिकाणी पदवी (Undergraduate) अभ्यासक्रमांसाठी प्रवेश दिले जातात आणि संबंधित महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था, स्वायत्त महाविद्यालये व संस्थांना संलग्न कनिष्ठ महाविद्यालय (Junior College) असेल, तेथे वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्रवेशाच्या सुरुवातीच्या टप्प्यावर एकूण प्रवेशसंख्या खालीलप्रमाणे विभागली जाईल :

८०% जागा संलग्न कनिष्ठ महाविद्यालयासाठी
२०% जागा इतर कनिष्ठ महाविद्यालयांसाठी

ब)

दोन्ही परिस्थितींमध्ये गुणवत्ता (merit), आरक्षण आणि पात्रतेचे नियम लागू राहतील. जर २०% कोटा वापरला गेला नाही, तर संलग्न कनिष्ठ महाविद्यालयातील प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल.इतर कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता,संलग्न कनिष्ठ महाविद्यालयातील शेवटच्या प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याच्या गुणवत्तेपेक्षा कमी नसावी.

क)

जर संलग्न कनिष्ठ महाविद्यालयासाठी राखीव ८०% कोटा वापरला गेला नाही, तर महाविद्यालयाला वरील नियमांच्या अधीन राहून इतर कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा अधिकार असेल.

ड)

जम्मू आणि काश्मीरमधून स्थलांतरित झालेल्या उमेदवारांसाठी प्रत्येक विभागात मंजूर प्रवेशसंख्येपेक्षा जास्त २ अतिरिक्त जागांची तरतूद असेल.

इ)

दिनांक ३० सप्टेंबर २०२२ च्या UGC पत्रानुसार, विद्यापीठांनी त्यांच्या विभागांद्वारे चालविल्या जाणाऱ्या सर्व अभ्यासक्रमा मध्ये मंजूर प्रवेशसंख्येपेक्षा २५% अतिरिक्त जागा निर्माण कराव्यात, ज्यामुळे परदेशी विद्यार्थ्यांना प्रवेश देता येईल. (पत्र 1-1/2022 (CPP-II), दिनांक 30-09-2022) तसेच, UGC च्या मार्गदर्शक सूचनांनुसारत्या अतिरिक्त जागांपैकी काही जागा गल्फ देशांतील भारतीय कामगारांच्या मुलांसाठी राखीव ठेवण्याचा सल्ला दिला आहे. विद्यापीठाला विविध विभागांमध्ये विशेष अभ्यासक्रम सुरू करणे किंवा न करणे तसेच प्रवेशसंख्या ठरवण्याचा पूर्ण अधिकार राखीव आहे.

**नियम क्र.२**

ड्रॉपआउट (शिक्षण सोडणाऱ्या विद्यार्थ्यांची समस्या) लक्षात घेता, मंजूर प्रवेशसंख्येच्या अतिरिक्त १०% विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाऊ शकतो.हा नियम संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था, विद्यापीठ विभाग, स्वायत्त महाविद्यालये आणि संस्थां मध्ये, प्रवेशाच्या सर्वसाधारण नियमांच्या अधीन राहून लागू असेल.

**नियम क्र. ३**

एकात्मिक पदवी अभ्यासक्रमाच्या (Integrated Degree Course) दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षात प्रवेश देताना, त्याच संलग्न महाविद्यालये,मान्यताप्राप्त संस्था, विद्यापीठ विभाग, स्वायत्त महाविद्यालये आणि संस्थांतील विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाईल.

**नियम क्र.४**

शारीरिकदृष्ट्या दिव्यांग विद्यार्थ्यांना एकात्मिक पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षात प्रवेश देताना,प्रवेश समिती इतर प्रवेश अटी पूर्ण झाल्यास, आपल्या निर्णयानुसार विशेष सवलत देऊ शकते.

**नियम क्र.५**

परदेशी विद्यार्थ्यांना पदव्युत्तर अभ्यासक्रम, मान्यताप्राप्त संस्था, संलग्न महाविद्यालये,स्वायत्त संस्था किंवा विद्यापीठ विभागां मध्ये प्रवेश दिला जाईल. यासाठी विद्यापीठाकडून दिलेले तात्पुरते पात्रता प्रमाणपत्र (Provisional Eligibility Certificate) आवश्यक असेल. परदेशी विद्यार्थ्यांचा प्रवेश विद्यापीठाच्या केंद्रीय प्रणालीद्वारे केला जाईल.

**नियम क्र.६**

प्रवेश रद्द करणे, शुल्क परतावा आणि मूळ कागदपत्रे न ठेवणे (UGC अधिसूचना, ऑक्टोबर २०१८ नुसार) प्रवेश रद्द करणे आणि शुल्क परतावा पुढीलप्रमाणे असेल:

अ. जामीन रक्कम (Caution Money), ग्रंथालय ठेव (Library Deosit) प्रयोगशाळा ठेव (Laboratory Deosit) इत्यादी सर्व ठेव रक्कम परत केली जाईल. मात्र, संस्थेच्या मालमत्तेचे नुकसान (उदा. प्रयोगशाळेतील साहित्याचे नुकसान, ग्रंथालयातील पुस्तके हरवणे इ.) झाल्यास आवश्यक तेवढी कपात केली जाईल.

ब. एखादा विद्यार्थी आपला प्रवेश रद्द करू इच्छित असल्यास, संबंधित संस्था UGC च्या मार्गदर्शक सूचनांनुसार (D.O. No. F.2-71/2022 (CPP-II), दिनांक 03/07/2023) प्रक्रिया पूर्ण करेल.

क. विद्यार्थ्याने भरलेल्या शुल्काच्या परताव्यासाठी पाच स्तरांची (Five-tier system) पद्धत लागू असेल.

शुल्क परताव्याचे टक्केवारी (Percentage of Refund of Fees)

| क्र | शुल्क परतावा (%) | प्रवेश रद्द करण्याची सुचना मिळण्याचा कालावधी (HEI) मध्ये |
|---|---|---|
| १ | 100% | प्रवेशाच्या अधिकृत अंतिम तारखेच्या किमान १५ दिवस आधी |
| २ | 90% | प्रवेशाच्या अधिकृत अंतिम तारखेच्या किमान १५ दिवसांपेक्षा कमी कलावधी आधी |
| ३ | 80% | प्रवेशाच्या अधिकृत अंतिम तारखेनंतर १५ दिवसांच्या आत |
| ४ | 50% | अंतिम तारखेनंतर १५ दिवसांपेक्षा जास्त पण ३० दिवसांच्या आत |
| ५ | 0% | अंतिम तारखेनंतर ३० दिवसांपेक्षा अधिक |

## * शिष्यवृत्ती व विशेष सवलती *

या महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या गरीब व होतकरू विद्यार्थी व विद्यार्थिनींना केंद्र व महाराष्ट्र सरकारतर्फे शिष्यवृत्ती व सवलती उपलब्ध करून दिल्या जातात. अशा सवलतींची व शिष्यवृत्तींची यादी खाली दिली आहे.

* ई. बी. सी.
* बी. सी. फ्रीशिप
* बी. सी. स्कॉलरशिप
* नॅशनल मेरिट स्कॉलरशिप
* सेंट्रल सेक्टर स्कॉलरशिप
* दिव्यांग विद्यार्थांसाठी स्कॉलरशिप
* मिलिटरी / सर्व्हिसमनच्या मुला-मुलींना फ्रीशिप
* प्राथमिक शिक्षकांच्या मुला-मुलींसाठी फ्रीशिप
* रयत शिक्षण संस्था फ्रीशिप
* शासकीय ओपन मेरिट स्कॉलरशिप
* हिंदी स्कॉलरशिप
* युनिव्हर्सिटी स्कॉलरशिप
* अनुसूचित जमाती, भटक्या विमुक्त जाती व अल्प उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांना सवलती

## * रॅगिंग प्रकरणाला आळा घालण्यासाठी आवश्यक तत्त्वे *

१. प्रवेश निश्चित झाल्यानंतर रॅगिंगसंबंधीचा ऑनलाइन फॉर्म भरणे अनिवार्य आहे.

२. या संदर्भात दोषी आढळल्यास तीन वर्षांपर्यंतची कैद व रु. २५,०००/- पर्यंत दंड, त्यासोबत न्यायालयीन चौकशीचा गुन्हा दाखल केला जाईल.

३. रॅगिंगसारखे गैरकृत्य करत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित विद्यार्थी व विद्यार्थिनींचा महाविद्यालयातून प्रवेश रद्द करण्यात येईल.

४. महाविद्यालयामध्ये प्रवेशांदरम्यान कोणत्याही प्रकारची समस्या उद्भवल्यास नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी अन्य व्यक्तीशी किंवा वरिष्ठ विद्यार्थी व विद्यार्थिनींशी संपर्क साधण्यापूर्वी प्राचार्यांशी संपर्क साधावा.

५. प्रवेश घेतल्यानंतर प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचे अधिकृत विद्यार्थी व विद्यार्थिनी आहेत. तेव्हा तुमच्यापेक्षा वरिष्ठ विद्यार्थी व विद्यार्थिनींनी किंवा अन्य व्यक्तींनी तुमच्या मनाविरुद्ध तुम्ही केलेल्या आदेशांचे पालन करणे गैर राहील.

## * पालक, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्याकरीता सूचना *

a. सर्व प्रकारच्या सवलती व शिष्यवृत्तीच्या कागदपत्रांची पूर्तता विद्यार्थ्यांनी वेळेत करावी. त्यासाठी नियमित नोटीस बोर्ड पाहावेत.

b. विद्यापीठ परीक्षा अर्ज वेळेत भरून घ्यावेत. अन्यथा लेट फी नियमांनुसार भरावी लागेल किंवा परीक्षेस बसता येणार नाही.

c. पालकांना नम्र विनंती:- महाविद्यालयामध्ये विद्यार्थी पालक मेळावा आयोजित केला जातो. त्या मेळाव्यास पालकांनी हजर राहणे आवश्यक आहे. महाविद्यालयाला पालकांचे सहकार्य अत्यंत आवश्यक आहे. वेळोवेळी महाविद्यालयाकडून आपल्या पाल्यांसंबंधी काही माहितीची विचारणा केली जाईल. त्यावेळी पालकांनी त्याची दखल घ्यावी व जरूर ते सहकार्य करावे.

d. विद्यार्थ्यांनी वर्षातील सर्व परीक्षांना उपस्थित राहून आवश्यक ते गुण मिळवले पाहिजेत. अन्यथा दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

e. मुदतीनंतर घेतलेला प्रवेश व शैक्षणिक सवलतीचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. त्यामुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

f. महाविद्यालयातील पात्रताधारक विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी स्थायी तक्रार निवारण समिती नियुक्त केली आहे.

g. प्रत्येक विद्यार्थी व विद्यार्थिनींकडे ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

h. महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी व महिला शिक्षक यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन केली आहे.

I. एखाद्या विद्यार्थी व विद्यार्थिनीला प्रवेश देण्याचा व दिलेला प्रवेश रद्द करण्याचा पूर्ण अधिकार प्राचार्यांना असेल.

## * भौतिक व शैक्षणिक पायाभूत सुविधा *

महाविद्यालय संस्थेच्या ३ एकर जमिनीवर आहे. त्यामध्ये बाह्य खेळासाठी मैदान आहे. महाविद्यालयामध्ये सुसज्य असे जिमनॅशियम आहे, त्यामध्ये इनडोअर खेळाची सोय आहे. महाविद्यालयामध्ये दोन संगणक प्रयोगशाळा आहेत ज्यांची क्षमता ४०+२ अशी आहे.

महाविद्यालयामध्ये कला, वाणिज्य व विज्ञान तसेच BCA शाखेमधुन शिक्षण घेण्याची कोर्सची सोय असुन पदवी विषयाबरोबर महाविद्यालयात कौशल्य आधारित कोर्सची सोय आहे. महाविद्यालया मध्ये Free Wi-Fi ची सोय आहे. विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालयातून बुक बँकची सोय आहे. गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी 'कमवा व शिका' योजने अंतर्गत शिक्षण पूर्ण करता येते. महाविद्यालयात दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रॅम्पची सोय करण्यात आली आहे.

महाविद्यालयाची पायाभूत सुविधा (Infrastructure) म्हणजे संस्थेच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजाला आधार देणाऱ्या भौतिक सुविधा व साधनसामग्री होय. महाविद्यालयाचा दृष्टीकोन व उद्दिष्टांनुसार शैक्षणिक उत्कृष्ठता साध्य करण्यासाठी येथे अत्याधुनिक सुविधा व ई-संसाधने उपलब्ध आहेत. महाविद्यालयात १३ प्रशस्त वर्गखोल्या व सेमिनार हॉल असून, त्यामध्ये आयसीटी (ICT) सुविधा उपलब्ध आहेत.

उपलब्ध भौतिक सुविधांचा योग्य वापर होण्यासाठी वर्गांचे वेळापत्रक नियोजनपूर्वक तयार केले जाते. विज्ञान प्रयोगशाळांमध्ये अत्याधुनिक उपकरणे उपलब्ध आहेत. उत्तम अध्ययन-अध्यापन वातावरण निर्माण करण्यासाठी इमारती व इतर सुविधांमध्ये सातत्याने सुधारणा व वाढ करण्याचा प्रयत्न महाविद्यालया मार्फत केला जातो. महाविद्यालयाचा सेमिनार हॉल आयसीटी सुविधांनी सुसज्ज असून, शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रमांसाठी उपयोगी ठरतो.

महाविद्यालयाच्या इमारती, ग्रंथालय व संगणक प्रयोगशाळांमध्ये अग्निशामक यंत्रणा (Fire Extinguisher) उपलब्ध आहे. तसेच, महाविद्यालयात वसतिगृह, ग्रंथालय सुविधा, विज्ञान प्रयोगशाळा, संगणक प्रयोगशाळा, कॅन्टीन, सेमिनार हॉल, मुलींसाठी विश्रांती कक्ष (Ladies Room), मुलींचे वसतिगृह, पिण्याचे पाणी, वीज जनरेटर या सुविधा देखील उपलब्ध आहेत.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालय सांस्कृतिक, क्रीडा व शारीरिक तंदुरुस्तीच्या विविध सुविधा उपलब्ध करून देते. महाविद्यालयात सेमिनार हॉलसारखी जागा सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी वापरली जाते. या उपक्रमांमध्ये नृत्य, नाटक व साहित्यिक कार्यक्रमांचा समावेश असतो, ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या कलात्मक व सर्जनशील गुणांना वाव मिळतो. महाविद्यालयाचे चांगल्या प्रकारे देखभाल केलेले क्रीडांगण आहे. त्याठिकाणी क्रिकेट, धावणे, कबड्डी, गोळाफेक यांसारख्या मैदानी खेळांसाठी सुविधा उपलब्ध आहेत. तसेच टेबल टेनिस, बुद्धिबळ कॅरम आणि बॅडमिंटन यांसारख्या इनडोअर खेळांसाठीही सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाभावना व निरोगी स्पर्धा विकसित होते. महाविद्यालयामध्ये सुसज्ज व्यायामशाळा (Gymnasium) असून, विद्यार्थ्यांना नियमित व्यायाम करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते, ज्यामुळे निरोगी जीवनशैली राखण्यास मदत होते. योगाचे शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी असलेले महत्त्व लक्षात घेऊन महाविद्यालयात स्वतंत्र योग केंद्र उपलब्ध आहे. येथे विद्यार्थी विविध आसने, प्राणायाम व ध्यान तंत्रांचा सराव करून आपले एकूण आरोग्य सुधारू शकतात.

## ❋ DigiLocker संदर्भात विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना: ❋

पायरी १ : ॲप डाउनलोड करा.
Play Store / A Store वरून "DigiLocker' ॲप डाउनलोड करा. किंवा www.digilocker.gov.in या वेबसाइटवर जा.
पायरी २ : Sign Up वर क्लिक करा'Create Account' / "Sign Up बटणावर क्लिक करा.
पायरी ३ : मोबाईल नंबर टाका पालकांचा आधार लिंक असलेला मोबाईल नंबर टाका. हाच नंबर APAAR फॉर्ममध्ये दिला आहे."Send OTP' वर क्लिक करा. OTP टाका व "Verify' करा.
पायरी ४ : आधार माहिती भरा "Aadhaar Number' पर्याय निवडा.विद्यार्थ्यांचा १२ अंकी आधार क्रमांक टाका. "Next' केल्यावर आधारशी लिंक असलेल्या मोबाईलवर पुन्हा OTP येईल. तो टाका.
पायरी ५ : सुरक्षा माहिती सेट करा ६ अंकी Security PIN सेट करा. हा PIN लक्षात ठेवा. पुढे लॉगिनला लागेल.Username व Password तयार होईल. ते लिहून ठेवा.
पायरी ६ : खाते तयार'Profile' मध्ये विद्यार्थ्यांचे नाव, जन्मतारीख, फोटो आधारवरून आपोआप येईल.
म्हणजे तुमचे DigiLocker खाते तयार झाले.

## Subject Basket Sem-I

| Course | DSC | OE | SEC | AEC | IKS | CC |
|---|---|---|---|---|---|---|
| BA | Marathi, Sociology, Psychology | Marketing Skill | Conversation Skill | | | NSS |
| | History, Geography, Economics | Financial Literacy | Historical Tourism | Eng. for Com. | IKS | Sports |
| | Hindi, English | | व्यक्तिमत्व विकास | | | Vivekvahini |
| BCOM | Accounting Paper -I | मराठी भाषेचे अंतरंग | Marketing Skill | Eng. For Bus. Com. | IBM | NSS |
| | व्यावसायिक प्रशासन | Basic English Usage | Insurance Skill | | | Sports |
| | व्यावसायिक अर्थशास्त्र | | Communication Skill | | | Vivekvahini |
| BSC | Che, Phy, Zoo, Micro | Marketing Skill | | | IKS | |
| | Che, Phy, Zoo, Micro | Basic English Usage | | | | |
| | Che, Phy, Zoo, Micro | मराठी भाषेचे अंतरंग | | | | |

## Subject Basket Sem-II

| Course | DSC | OE | SEC | AEC | IKS | CC |
|---|---|---|---|---|---|---|
| BA | Marathi, Sociology, Psychology | Marketing Skill | Conversation Skill | Eng. for Com. | IKS | NSS |
| | History, Geography, Economics | Financial Literacy | Historical Tourism | | | Sports |
| | Hindi, English | | व्यक्तिमत्व विकास | | | Vivekvahini |
| BCOM | Accounting Paper - II | साहित्याची रूपे | Digital Marketing | Eng. For Bus. Com. | VEC-I Indian Constitution | CEP |
| | व्यावसायिक प्रशासन II | I R C English | Insurance Skill | | | |
| | व्यावसायिक अर्थशास्त्र II | | Communication Skill | | | |
| BSC | Che, Phy, Zoo, Micro | Marketing Skill | | | VEC (Democracy, Election, Constitution) | |
| | Che, Phy, Zoo, Micro | Basic English Usage | | | | |
| | Che, Phy, Zoo, Micro | मराठी भाषेचे अंतरंग | | | | |

## ग्रंथालय (ज्ञानस्त्रोत केंद्र)
### Knowledge Resource Centre

ग्रंथालयाची सुरुवात १९८९ साली महाविद्यालयाच्या स्थापने सोबतच झाली. तेव्हापासून ग्रंथालयाने पुस्तके, नियतकालिके, इतर साधनसंपत्ती व सेवा याबाबतीत सातत्याने प्रगती केली आहे. आता सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांना समाधानकारक सेवा देण्यासाठी सतत प्रयत्न केलेला आहे. ग्रंथालयात पुरेशी जागा उपलब्ध आहे. माहिती व संप्रेषण, तंत्रज्ञानाच्या सुविधांचा वापर करून सेवा देण्यासाठी तांत्रिक प्रगतीसह पारंपरिक ग्रंथालय पद्धतीची जागा आता वापरकर्ता-केंद्रित पद्धतीने घेतली आहे. इंटरनेट सुविधा, OPAC, ई-पुस्तके, ई-नियतकालिके, बारकोड रीडर युजर ट्रॅकिंग सिस्टम, बारकोड स्कॅनरसह पुस्तक देवाण-घेवाण, सुविधा दिल्या जातात. ग्रंथालयात संदर्भ ग्रंथ, विश्वकोश, शब्दकोश, चरित्रे, आत्मचरित्रे व इतर वाचन साहित्य इत्यादींचा संग्रह आहे.

आम्ही N-List आणि NDL डेटाबेसद्वारे ई- साधनांची सेवाही पुरवतो. ग्रंथालयात १३७५१ ग्रंथ उपलब्ध आहेत. आम्ही विविध विषयांवरील १२ पेक्षा जास्त नियतकालिके व मासिके तसेच मराठी प्रादेशिक भाषेसह हिंदी व इंग्रजी भाषेतील दररोज ७ वर्तमानपत्रे येतात. आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी अत्यल्प दरात बुक बँक सुविधा दिली जाते. ग्रंथालय सेवा मोफत इंटरनेट सुविधा, N-list, ई-साधनसंपत्ती, मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रे, नियतकालिक सेवा, वाचन कक्ष, वाचक मंडळ, नवीन आलेली पुस्तकांचे प्रदर्शन, नकाशे, जुन्या कॅसेट व सीडी, नियतकालिकांचे बाइंड केलेले खंड, ग्रंथालयात मुक्त प्रवेश, संदर्भ सेवा, आंतर-ग्रंथालयीन देवघेव योजना, स्पर्धा परीक्षेची पुस्तके, कमवा व शिका योजना, माहिती सेवा, ग्रामस्थांसाठी सदस्यत्व,ग्रंथालयाशी संबंधित विविध कार्यक्रमांचे आयोजन या आणि अशा अनेक सेवा ग्रंथालयामार्फत दिल्या जातात.

### ❋ कमवा व शिका' योजना ❋

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणातून स्वावलंबन हा मूलमंत्र दिला. 'कष्ट केल्याशिवाय फळ नाही' या तत्त्वावर आधारित 'कमवा व शिका' योजना रयतच्या प्रत्येक महाविद्यालयात राबविली जाते. आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये, हा या योजनेमागचा कर्मवीरांचा दृष्टिकोन आहे. ग्रामीण, कष्टकरी व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना आर्थिक मदत करणे. 'काम हेच शिक्षण' या कर्मवीरांच्या विचारानुसार विद्यार्थ्यांमध्ये कष्टाची सवय व स्वाभिमान निर्माण करणे. कामातून वेळेचे व्यवस्थापन, जबाबदारी, व कार्यालयीन कामाची ओळख करून देणे. हा या योजनेचा उद्देश आहे.

योजनेतून मिळणारे लाभः

आर्थिक स्वावलंबनः शिक्षण फी, वसतिगृह फी, पुस्तके व इतर शैक्षणिक खर्चासाठी मदत.
अनुभव प्रमाणपत्रः वर्ष पूर्ण झाल्यावर प्राचार्यांच्या स्वाक्षरीचे 'कामाचा अनुभव' प्रमाणपत्र दिले जाते.
व्यक्तिमत्त्व विकासः शिस्त, संघभावना, नेतृत्वगुण व संवाद कौशल्य विकसित होते.
कर्मवीर विचारांची जोपासनाः प्रत्यक्ष कृतीतून 'श्रमाशिवाय शिक्षण नाही' हा संस्कार रुजतो.

# * करिअर कट्टा *

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना 'पुढे काय?' हा प्रश्न प्रत्येकाला पडतो. याच प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'करिअर कट्टा' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

करिअर कट्टा म्हणजे काय?

करिअर कट्टा हे एक असे व्यासपीठ आहे जिथे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षा तयारी, कौशल्य विकास आणि उद्योजकता याबाबत संपूर्ण माहिती व प्रशिक्षण मिळते. हा उपक्रम फेब्रुवारी २०२१ पासून राज्यातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांत राबवला जात आहे.

करिअर कट्टाचे प्रमुख फायदे:

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन: UPSC, MPSC, बँकिंग, रेल्वे यांसारख्या परीक्षांसाठी तज्ञांचे मार्गदर्शन. "IAS आपल्या भेटीला' सारखे उपक्रम.

कौशल्य विकास: इंग्रजी संभाषण, संगणक, सॉफ्ट स्किल्स यांचे ऑनलाइन कोर्सेस.

उद्योजकता विकास: 'उद्योजक आपल्या भेटीला' या माध्यमातून यशस्वी उद्योजकांशी थेट संवाद.

